सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३४६
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Phone: (020) 2562 1346
E-mail: bee@pun.unipune.ac.in

**संदर्भ** : परीक्षा/छावता/१७५४

**दिनांक** : ०७/११/२०२५ ०८

## अंतिम मुदतवाढ

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि दादरा—नगर हवेली जिल्हा)

**विषय :** **B.Sc. To B.Sc. आणि B. A. To B. A.(For Students/Examinee admitted in A.Y. 2024-2025 Only) हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२५ परीक्षांचे आवेदन पत्र/अर्ज ऑफलाईन पध्दतीने सादर करण्याच्या मुदतवाढीबाबत.....**

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१७२६, दिनांक १/११/२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास व संदर्भीय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, **B.Sc. To B.Sc. आणि B. A. To B.A.(For Students/Examinee admitted in A.Y. 2024-2025 Only) हिवाळी सत्र (ऑक्टोबर/ नोव्हेंबर)** २०२५ परीक्षांचे आवेदन पत्र प्रचलित पध्दतीनुसार विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील पी.डी.एफ. अर्ज डाऊनलोड करून सत्रपूर्ततेच्या प्रचलित नियमांच्या अधीन राहून योग्य त्या शुल्कासह भरावी आणि संबंधित परीक्षा अर्जासंदर्भातील तद्अनुषगिक माहिती https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdPPkEn3UZtRoU2BnW8NuhezW8zy2mnc_hLaaGrSHDoFlMTiQ/viewform या **ऑनलाईन लिंकवर भरून अर्जाची प्रत छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे — ४११ ००७ येथे महाविद्यालयामार्फत दिनांक ६/११/२०२५ पर्यंत सादर करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि, सदर मुदतीत वरील अर्ज सादर करू न शकल्यामुळे त्यास मुदतवाढ देणेबाबत विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना, संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून वारंवार विनंती व पाठपुरावा करण्यात येत आहे.**

त्यास अनुसरून व विद्यार्थी हित विचारात घेता वरील परीक्षेच्या परीक्षा व मूल्यमापन बाबींच्या तसेच पूर्वीच्याच अटी व शर्तींच्या अधीन राहून उपरोक्त परीक्षा अर्ज विहित शुल्कासहित भरण्याचा कालावधी **दिनांक ०८/११/२०२५ ते दिनांक ११/११/२०२५ पर्यंत मुदवाढ देण्यात येत आहे.** तसेच महाविद्यालयाने सदरचे परीक्षा अर्ज विहित शुल्कासह वरीलप्रमाणे ऑनलाईन माहिती भरून मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नावे देय असलेला धनाकर्ष (Demand Draft) विद्यापीठाच्या **वित्त व लेखा विभागात जमा करून त्याची पोहोच घेऊन परीक्षा अर्जासहित दिनांक १२/११/२०२५, दुपारी १२.०० पर्यंत छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे — ४११ ००७ येथे महाविद्यालयामार्फत जमा करावेत.**

सदर पत्रातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा तसेच उपरोक्त परीक्षेपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची सर्वोतपरी काळजी आपल्या महाविद्यालय/परिसंस्था प्रशासनाने घ्यावी, ही विनंती.

**(प्रा. (डॉ.) प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीसाठी:** मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ